सं.क्र.-१६०/सं.क.
१६/१२/१७

महाराष्ट्र शासन

१८

दूरध्वनी क्र.०२२ २२८२६८११

क्र.माअअ-२०१७/प्र.क्र.२६८/प्रशासन-२,
वित्त विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ डिसेंबर, २०१७

प्रति,

१) राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) संचालक, लेखा व कोषागरे संचालनालय, मुंबई.
३) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, नवी मुंबई.
४) विमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) आयुक्त, लॉटरी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) **सर्व जन माहिती अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई 32.** (ई-मेल द्वारे)

विषय : माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपालखर्चासह कळविण्याबाबत आणि माहिती अधिकाराशी संबंधित पत्रव्यवहाराचा आढावा घेऊन त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.(२०८/१७)सहा, दि.१७.११.२०१७ कृपया पहावे. सदर परिपत्रकाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in ह्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

२. जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर, १०व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपाल पृष्ठसंख्या व टपालखर्चासह, जलदगती टपालाने तपशीलवार कळवावी, तसेच सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यालयातील माहिती अधकाराशी संबंधित पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन माहिती अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी दरवर्षी आवश्यक आर्थिक तरतूद करावी, असे निर्देश उपरोक्त परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत.

३. उपरोक्त परिपत्रकातील तरतुदी आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणाव्यात, ही विनंती.

(स्वाक्षरी)

( रेखा काळसेकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) निवड नस्ती (प्रशासन-२) (सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.११.२०१७ च्या परिपत्रकाच्या प्रतीसह)

२) कक्ष अधिकारी (संगणक कक्ष), वित्त विभाग.
सदर ~~परि~~पत्राची प्रत वित्त विभागाच्या वेबसाईवर प्रकाशित कर

२७१३९११ ९९

प.स.(व्यय)
4/12/17

माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपालखर्चासह कळविण्याबाबत आणि माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा आढावा घेऊन त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१७ /प्र.क्र.(२०८/१७) सहा.

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक- १७.११.२०१७.

परिपत्रकः-

माहिती अधिकारात अर्जदाराला वेळेवर माहिती मिळण्यासाठी, जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास जलदगती टपालाने टपालखर्चासह तपशीलवार कळविण्याबाबत एक परिपत्रक निर्गमित करण्याचे निर्देश व्दितीय अपील क्र.केआर ५०४१/२०१६ मध्ये दि.९.८.२०१७ रोजी मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी दिले आहेत आणि अन्य व्दितीय अपील क्र.केआर ५१८४/२०१६ मध्ये १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम जलदगती टपालाने अर्जदारास टपालखर्चासह कळविण्यासह शासन कार्यालयातील माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी आवश्यक आर्थिक तरतूद तीन महिन्यात करण्याचे निर्देश मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी दि.११.८.२०१७ रोजी दिले आहेत. मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ यांच्या सदर निर्देशानुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सुचित करीत आहे.

२. "जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर, १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपाल पृष्ठसंख्या व टपालखर्चासह, जलदगती टपालाने तपशीलवार कळवावी. तसेच सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यालयातील माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन माहिती अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी दरवर्षी आवश्यक आर्थिक तरतूद करावी ".

३. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनिक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

5/12

उ.स.(श्री.शेख)

८०/२०१७
१.१२.१७

CR-268/17

प्र.स.(श्री)



४ सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७१११७११३२२९३००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(छा.कि.वडते)
शासनाच्या उप सचिव.

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३. सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६. *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७. *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०.*प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११.मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१३.सर्व मंत्रालयीन विभाग
१४.सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी
१५.महासंचालक, यशदा, पुणे
१६.निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा. *पत्राने